**PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION**
**JAGADGURU SANT TUKARAM MAHARAJ SANTPITH**
**SCHOOL & JR. COLLEGE**
Patilnagar, Talgaon Chikhali, Pune - 411062
Affiliation No: 1120131 School Code: 32147 UDISE CODE: 27252000538

Contact No: 9022816058 E-mail : santpithschool@gmail.com

**जा.क्र.संतपीठ/स्कूल/०१/कावि/ ११७/२०२६ - २०२७** **दिनांक - ३१/०८/२०२६**

**विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रवर्तित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अ‍ॅन्ड ज्युनिअर कॉलेजमधील पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांच्या बैठकीसाठी इवा फोम इंटरलॉकिंग मॅट (इथिलीन व्हिनाईल अ‍ॅसीटेट) खरेदीबाबत...**

प्रति,
मा.---------------------
-----------------------

**कोटेशन नोटीस क्र. १८/२०२६ - २०२७**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रवर्तित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अ‍ॅन्ड ज्युनिअर कॉलेज सी.बी.एस.ई शालेय अभ्यासक्रमावर आधारित असल्याने पूर्व प्राथमिक वर्गात लाकडी बेंच ऐवजी सुरक्षित, नॉन-टॉक्सिक, वॉशेबल मॅटवर आसन व्यवस्था करणे आवश्यक आहे. सदर विद्यार्थ्यांच्या आसन व्यवस्थेसाठी इवा फोम इंटरलॉकिंग मॅट (इथिलीन व्हिनाईल अ‍ॅसीटेट) खरेदी करणेकामी व सदर साहित्याच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकामी सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे...

| अ. क्र | साहित्याचा तपशील | स्पेसिफिकेशन | नग संख्या | सर्व करांसह प्रति नग दर |
|---|---|---|---|---|
| 1. | Interlocking Floor Mat | Product: EVA (Ethylene Vinyl Acetate) Interlocking Floor Mat<br>Size: 2 Feet x 2 Feet<br>Thickness: 14mm<br>Type: Interlocking Puzzle Type (4 Side Interlock)<br>Material: 100% Virgin EVA, Non-Toxic,<br>Density: 75+1-10 Kg/m<br>Hardness: Shore A 20-25<br>Waterproof & Washable<br>Color: Multi-Color<br>Warranty:1 year | 1 | |

**कोटेशन नोटीस व नियम अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. इच्छुक ठेकेदारांनी / पुरवठाधाराकांनी उपरोक्त नमूद केलेल्या साहित्य / कामाचे दर दिलेल्या स्पेशिफिकेशन नुसार व आवश्यक त्या कागदपत्रांसह सिलबंद पाकिटात मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अ‍ॅन्ड ज्युनिअर कॉलेज, पाटीलनगर, टाळगाव चिखली यांचे नावे दिनांक - ३१ ऑगस्ट २०२६ ते ०९ सप्टेंबर २०२६ अखेर दुपारी ३:०० वाजेपर्यंत जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अ‍ॅन्ड ज्युनिअर कॉलेज, पाटीलनगर, टाळगाव चिखली, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे ४११०६२ येथे सादर करावे.

२. पुरवठा धारकाने कोटेशन सोबत शॉप अ‍ॅक्ट / उद्यम आधार नोंदणी दाखला, पॅनकार्ड, जी.एस.टी प्रमाणपत्र, आयकर भरत असलेबाबतचा मागील २ वर्षाचा पुरावा इ. कागदपत्रांच्या प्रती सादर करण्यात याव्यात.

३. पुरवठा धारकाने आपले दर सर्व करासह व वाहतूक खर्चासह पोहोच देण्यात यावे.

४. कोटेशन नोटीसमधील नमूद स्पेसिफिकेशनुसार इवा फोम इंटरलॉकिंग मॅट साहित्याचा पुरवठा स्वखर्चाने जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अ‍ॅन्ड ज्युनिअर कॉलेज हे पाटीलनगर, टाळगाव चिखली येथे करावा लागेल.

५. पुरवठा आदेशानुसार दिलेल्या मुदतीत सदर साहित्याचा पुरवठा न केलेस प्रतिदिनी रक्कम रुपये ५००/- विलंब शुल्क आकारणेत येवून त्याची देय बीलातून वसुली करणेत येईल.

६. मंजूर केलेले दर सदर साहित्याचा पुरवठा पूर्ण होईपर्यंत तसेच एक वर्ष कालावधीकरीता पुरवठाधरकावर बंधनकारक राहतील.

७. पुरवठा धारकास कोणत्याही प्रकारची भाववाढ / नुकसान भरपाई मिळणार नाही.

८. सिलबंद कोटेशन पाकिटावर नोटीस क्रमांक फर्म /कंपनीचे नावाचा स्पष्ट उल्लेख करावा.

९. उशिरा आलेल्या व अपुऱ्या तसेच अटीयुक्त कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

१०. कोटेशन मंजूर दराने पुरवठाधारकाने कामकाज करून देण्यास अथवा साहित्याचा पुरवठा करणेस टाळाटाळ करणेस असमर्थता दर्शविलेस किंवा साहित्याचा पुरवठा अर्धवट केल्यास कोटेशन नोटीस मधील नमूद अटीचा भंग केल्यास संबंधित पुरवठाधारकाचा पुरवठा आदेश रद्द करणेत येईल व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.भांखस - प्र.क्र.८२/भाग III/उद्योग - ४ दि.१/१२/२०१६ नुसार त्यांचेवर विधिवत कार्यवाही करणेत येईल.

११. कोटेशन संपूर्ण प्रक्रियेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ) हे लवाद म्हणुन जो निर्णय देतील तो अंतिम राहील. जो उभयंतावर बंधनकारक राहील.

१२. सदरचे काम हे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राचार्य यांच्या सूचनेनुसार करावयाचे आहे. त्यांच्या पोहोच चलनानुसार बील अदा करणेत येईल.

१३. कोणतेही कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ यांनी राखून ठेवला आहे.

१४. सदरची कोटेशन नोटीस संतपीठाचे www.santpithpcmc.com या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

(संदीप खोत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ